


# संकरीत मका

लेखक : जे. एच्. ठोंबरे, बी. ए.

प्रिय शेतकरी बंधुंनो गेल्या दोन आठवड्यांत आपण हायब्रीड भात आणि हायब्रीड बाजरी ह्या दोन पिकांविषयीं माहिती मिळविली. आज आपण 'संकरीत मका' विषयी माहिती मिळवूं.


अमेरिकेंत ९९ टक्के शेतकरी मक्याची लागवड करतात. उलट महाराष्ट्रांत मक्याची लागवड अगदी कमी प्रमाणांत आहे. सध्यां अन्नटंचाईच्या काळांत मक्याचा नित्य आहारांत खाद्य म्हणून मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. यासाठीं महाराष्ट्रांत प्रत्येक शेतकऱ्यानें मक्याची लागवड करावी.

महाराष्ट्राकरितां डेक्कन डबल हायब्रीड, रणजीत डबल हायब्रीड आणि गंगा १०१ डबल हायब्रीड ( संकरीत मका ) ह्या जाती शासनानें पुरस्कृत केल्या आहेत.

### संकरीत मक्याची लागवड

सुधारलेल्या मशागतीच्या पद्धतीचा अवलंब करूनच संकरीत मका मोठ्या प्रमाणांत यशस्वी होते. त्यांपैकीं कांहीं प्रमुख बाबी खालीलप्रमाणें आहेत :–

१) जमिनीची उत्तम मशागत करावी.



२) कंपोस्ट खताचा भरपूर प्रमाणांत वापर करावा.

३) बियांची टोकण पद्धतीनें लागवड करावी. दोन बियांत ३० इंच गुणिले १० इंच अंतर ठेवावें

४) भरपूर प्रमाणांत वरखतांचा वापर करावा.

५) वेळोवेळीं आणि योग्य वेळीं आंतरमशागत करावी.

६) योग्य वेळीं पिकास पुरेसा पाण्याचा पुरवठा करावा.

७) पिकाचें किडीपासून व रोगापासून संरक्षण करावें.

### जमीन कशी असावी ?

पाण्याचा निचरा होणारी भारी काळी अथवा मध्यम काळ्या जमिनीत मका चांगला होतो. नदीकांठच्या गाळाच्या जमिनींत हें पीक उत्तम येतें.

### मशागत कशी करावी ?

लोखंडी नागरानें पाच ते सहा इंच खोल नांगरट करावी. यानंतर दोन ते तीन पाळ्या द्याव्या. ताग गाडल्यास अधिक उत्तम पीक येतें.

### हंगाम

संकरीत मकाचा खरीप हंगाम जून–जुलै महिन्यांत लागवड करतात तर रब्बी हंगामाची लागवड ऑक्टोबर महिन्यांत करतात बागायत मका जानेवारी–फेब्रुवारी महिन्यांत देखील लागवड करतां येईल.

### पेरणी :

संकरीत मका टोकण पद्धतीनें लावतात. दोन बियांत ३० इंच गुणिले १० इंच अंतर ठेवावें. बी दोन इंचापेक्षां खोल लावूं नये. बीं ओल्या मातीनें झांकलें जाईल याची खबरदारी घ्यावी. बियांचें दर एकरीं ६ किलो बीं लागतें.

### पाणीपुरवठा

खरीप मक्यास जरूर पडल्यास एक दोन पाळ्या पाणी द्यावें रब्बी मक्यास मात्र दर १० ते १५ दिवसांनीं पाण्याची पाळी द्यावी. पेरणीनंतर पाण्याची पहिली पाळी थोडी उशीरां द्यावी. रब्बी हंगामांत एकूण ८ ते १० पाळ्या पाण्याच्या द्याव्या.

### खतें

हें पीक खताच्या बाबतींत अतिशय खादाड आहे. पेरणीपूर्वी एकरी १० ते १५ गाड्या कंपोस्ट खत जमिनींत चांगलें मिसळावें आणि वरखतें म्हणून एकरीं ४० किलो नायट्रोजनचा हप्ता द्यावा संपूर्ण ओलीताखालील पिकाला यापेक्षां जास्त म्हणजे एकरीं ६० ते ७० किलो नायट्रोजन दोन हप्त्यांत मिळून दिल्यानें जास्त फायदा होतो. किंवा मिश्र खतें पहिल्या हप्त्यांत एकरीं ३०० किलो ९:९:५ प्रमाणाचें मिश्रखत पेरणीपूर्वी द्यावे. पेरणीनतर दुसरा हप्ता २५ किलो नत्राचा द्यावा.

### आंतरमशागत :

सुरुवातीस मका झपाट्यानें वाढत नाही. त्यासाठी निंदणी काळजीपूर्वक करावी. नंतर काळपणी करावी पीक पुढें झपाट्यानें वाढत असल्यानें रोपाच्या बुडाशी मातीची भर घालावी. त्यामुळें रोपाला आधार मिळून रोप चांगलें वाढतें.

### काढणी

कणसें पिवळसर बनलीं कीं पीक तयार झालें असें समजावें अशा वेळीं आंतील दाणे टणक होतात. त्या वेळीं तीं खुडून काढावीत व दोन ते तीन दिवस उन्हांत वाळवावीत. नंतर दाणे वेगळे करावेत. सहसा आपल्याकडें हिरवीं कणसें काढून भाजून खातात. अशीं कणसें बाजारांत विकलीं जातात व बराच फायदा होतो. हिरवीं ताटें जनावराला सकस चारा म्हणून उपयोगी पडतात.

### सांठवणी व बाजारहाट

कणसापासून दाणे वेगळे केल्यावर ते चांगले उन्हांत वाळवून यांची सांठवणी पोत्यांत अगर कणगींत करतात. कित्येक वेळां वाळविल्याबरोबर त्याची बाजारांत विक्री केली जाते.

### एकरीं उत्पादन

जमिनीचा प्रकार, हंगाम, खत, पाणी, यांचा परिणाम संकरीत मक्याचें एकरीं उत्पादनावर दिसून आल्याशिवाय रहात नाही. साधारणपणें दर एकरीं २५ ते ३० क्विंटल उत्पादन निघतें.

### कीड व त्यावरील उपाय

१) खोड किडा :– ही कीड ज्वारींतील खाड किड्याप्रमाणेंच नुकसान करतें कोरड्या हवामानांत ही कीड मक्याचे नुकसान करतें.

### उपाय

अळी खोडांत राहून नुकसान करीत असल्यामुळें रासायनिक कीटकनाशकांचा काहींच उपयोग होत नाहीं. तथापी खालील उपाय करावेत :–

१) किडलेलीं ताटें काढून टाकून तीं नष्ट करावीत.

२) पिकाच्या काढणीनंतर शेतांतील धसकटें गोळा करून जाळावीत म्हणजे त्यांतील सुप्तावस्थेंत असलेल्या अळ्या नष्ट होतील.

३) लष्करी अळी :– ही अळी रात्रींच्या वेळीं पानें कुरतडून खाते व दिवसां पानांच्या सुरळीत किंवा मातीच्या ढेकळाखालीं दडून बसते. ही अळी एका शतातील खाद्य संपल्यावर दुसऱ्या शेताकडे मोर्चा वळविते. म्हणून ह्या किडीस 'लष्करी अळी' असें नांव पडलें आहे.

### उपाय

१) १० टक्के बी. एच. सी. भुकटी एकरी १५ किलो या प्रमाणांत मारली तर किडीचा बंदोबस्त होतो हें औषध वारा कमी असताना सायंकाळीं मारल्यास जास्त परिणामकारक ठरतें. कारण रात्रीं कीड कार्यक्षम असतें.

२) अर्धा किलो ५० टक्के पाण्यांत मिसळणारी बी. एच सी. भुकटी ६० ते ७० लिटर पाण्यांत मिसळून हें मिश्रण एकरीं ४०० ते ४५० लिटर या प्रमाणांत फवारावें.

### रोग व त्यावरील उपाय

१) तपकिरी ठिपके :– हा रोग एक प्रकारच्या बुरशीपासून होतो पानावर वेगवेगळ्या आकारांचे करड्या रंगाचे ठिपके दिसतात. त्याच्या कडा तांबड्या असतात. असे बरेच ठिपके एकत्र येऊन पानें वाळतात.

### उपाय

पेरणीपूर्वी बियांस पारायुक्त औषध लावावें.

प्रमाण :– १:४००. म्हणजे २ किलो बियांस ५ ग्रॅम पारायुक्त औषध लावावें.

वरीलप्रमाणें पिकाची काळजी घेतल्यास मका पीक खात्रीनें उत्पादनांत भर घातल्याशिवाय रहाणार नाहीं असा आत्मविश्वास बाळगून आपण प्रत्येक शेतकऱ्यानें संकरीत मक्याची लागवड करावी. तेणेंकरून जनावरांना चारा मिळण्याची सोय होते आणि आपल्या राष्ट्रीय उत्पादनांत भर पडते. ••

# कोल्हापुरांत हातभट्टीच्या गंमती

## कोल्हापुरी दणका— लेखक : शरद कारखानीस

### राजारामपुरींत दरोडा।

कोल्हापूरमध्यें राजारामपुरी या वसाहतींत नुकतेंच दणदणीत दरोडे पडले. रात्रीं एकच्या सुमारास शारदा हौसिंग सोसायटीमध्यें इंदुलकर यांच्या घराचा दरवाजा फोडून सशस्त्र अशा दहाबारा दरोडेखोरांनी चांगलीच लूट केली. एवढेंच नव्हें तर घरच्या लोकांना खरपूस मार दिला. मदतीला येऊं पाहणाऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना गोफणीने दगड मारलें. हा दरोडा एवढ्यावच संपला नाहीं तर पुढें या ठकसेनांच्या टोळीनें टेंबलाईवाडी या भागांत एका पोलीस कॉंस्टेबलच्याच घरावर डाका घातला! या घटनेमुळें कोल्हापुरांतील जनता हवालदिल झाली आहे. विशेषतः राजारामपुरीतील नव्या वसाहती, शिवाजी विद्यापीठ विभाग, रुईकर कॉलनी एक्सटेंशन वाशीनाका. कळंबा येथील लोकवस्तींत असुरक्षिततेचें वातावरण पसरलें आहे. ही भयंकर घटना असूनही पोलीस खात्यानें मात्र प्रथमतः ती लपविण्याचा आणि नंतर तिची तीव्रता कमी भासविण्याचा प्रयत्न केला. परंतु कांहीं पत्रकारांच्या जागरूकतेमुळें तो अयशस्वी ठरला.

### कोल्हापुरांत दारुबंदी ।

कोल्हापूरांत आजकाल दारुबंदी कायद्यावर असाच दिवसाढवळ्या दरोडा पडत आहे. दारुबंदीमुळें सर्वत्रच चोरट्या दारुचा सुळसुळाट वाढला हें खरें! पण कोल्हापूरची परिस्थिती वेगळीच आहे. दारुबंदीच्या संदर्भांत नेमण्यांत आलेल्या टेकचन्द समितीनें जी पहाणी केली आणि साक्षीपुरावे गोळा केले त्यांमध्यें अनेक मनोरंजक गोष्टी उजेडांत आल्या. कोल्हापूरच्या परिसरांतील गंमतीजमती जरी एकत्र केल्या तर त्यामधून 'हास्यचिंतामणी' सारखा 'ईनोद' ग्रंथराज निर्माण होईल. संस्थानी काळांत कोल्हापूरमध्यें अर्थातच दारुबंदी नव्हती. इंग्रजी' वरही आपली तलफ भागवूं न शकणारा असा एक वर्ग होता आणि तो हातभट्टीच्या देशी दारूसाठीं तरसायचा! कांहीं हातभट्टीवाले यासाठीं भट्टी लावायचें, पण ही दारु आरोग्यविघातक असल्यानें संस्थानीं काळांतही तिच्यावर बंदी होती. जंगलांतून या भट्ट्या असायच्या आणि घोडेस्वार शिपाई त्यावर छापे घालायचे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थान विलीन झालें आणि संपूर्ण दारुबंदीचा अंमल सुरूं झाला! गुळाचें आगर असलेल्या कोल्हापूरांत गुळापासून हातभट्टीची दारु यानंतर मोठ्या प्रमाणावर होऊं लागली. नंतर साखर कारखानें उभारलें गेलें. अर्थात साखर कारखान्यातील मळी जर दारुसाठीं वापरली असती तर साखरेचा उत्पादन खर्च बराच कमी झाला असता. पण ही मळी साधारणपणें पन्नास रुपये टन या भावानें देऊन कोलंबो–सिलोनची कंपनी त्याच्या वहातुकीसाठीं तीन-चारशें रुपये खर्च करून मद्यनिर्मिती करून भरमसाठ नफा मिळवी. दारुबंदीबावत योग्यवेळीच वस्तुनिष्ठ धोरण स्वीकारलें असतें तर किती फलदायी ठरलें असतें हें यावरून दिसून येतें. आतां कोल्हापूर जिल्ह्यांत कोल्हापूर शुगर मिलचा एक अल्कोहोल प्लँट आहे, डिस्टीलरी आहे, शिवाय वारणा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरांत इतर तीनचार सहकारी कारखान्यांच्या सहकार्यानें मद्यनिर्मिती होणार आहे. आज साखरेवर जेवढी बंधनें नाहींत तेवढी मळीवर आहेत. कराडच्या कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन नि आजचे डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असो.चे अध्यक्ष श्री. जयवंतराव भोसले यांनीं ही माहिती सांगितली होती. कोल्हापूरला जर योग्य त्या शास्त्रीयदृष्टीनें मद्यार्क निर्मिती सुरूं झाली तर दारुबंदीला सुटी दिलेल्या महाराष्ट्राची गरज भागूं शकेल!

### ताक कोण पिणार हो।

पण हातचें सोडून पळत्या पाठी लागणाऱ्या दारुबंदीच्या धोरणानें आज कोल्हापूरची उत्पादक शक्ती नि साधनें वांया जात आहेत. हातभट्टीच्या दारुचा सुळसुळाट फार वाढला आहे. साडेतीन टक्के मद्यार्कांच्या खुल्या धोरणाप्रमाणें येथें आतां 'बियर'ची खुली विक्री सुरूं आहे. पण प्राशकांच्या जगांत बियर हें ताक ठरतें आणि दुधाची बरोबरी ताक करूं शकत नाहीं! कुंजारभाट वसाहत आज केवळ हातभट्टीमुळें भरभराटली आहे. कोल्हापूरांत 'मीलन' ची भजी जेवढी लोकप्रिय आहेत तेवढीच 'पडाळीची पहिल्या धारेची' पॉप्युलर आहे. रेड करायची पोलिसी तंत्रें, पोलीस–भट्टीवाले संगनमत या गोष्टी आतां इतक्या सरावल्या आहेत कीं त्याबद्दल आतां कांहीं वाटतही नाहीं. मध्यंतरी म्हणें रेड करण्यासाठीं पोलीसांनीं दोन साक्षीदार घेतले आणि धाड घातली बरीच गॅलन दारु मिळाली. साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या आणि शेवटीं त्या साक्षीदारांना मेहनताना म्हणून रॉकेलचे दोन दोन डबे व हातभट्टीचीं दारु दिलीं! आहे कीं नाहीं गंमत!

म्हैसूर राज्यानें संपूर्ण दारुबंदी उठविल्यानें त्याजवळ, सीमेवरच असलेल्या कोल्हापूर जिल्ह्याला त्याचा फायदा मिळाला आहे. निपाणीला सर्व प्रकारची खुली विक्री सुरूं आहे मग मधलें तीस मैलांचें अंतर तोडायला किती उशीर लागणार!

### कोर्टातल्या ब्रँडीच्या बाटल्या गायब!

कोल्हापूरांत मध्यंतरी पोलिसांनीं शिवाजी पेठेत छापें घालून परदेशी दारु पुरविणारा, सर्व आधुनिक साधनांनीं सुसज्ज असा अलिशान बारच उघडकीस आणला होता. त्या संदर्भांत पोलीस खात्यांत अंतर्गत झगडेही झाले. शेवटी दोन सब इन्स्पेक्टरांच्या बदल्या या प्रकरणांत झाल्या होत्या.

परवां परदेशी दारुच्या केसमध्यें कोर्टाच्या ताब्यांत असलेल्या आठ दहा ब्रँडीच्या बाटल्या गायब झाल्या आहेत! कोर्ट हें गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठीं असतें. पण दारुमुळें कोर्टच गुन्हेगारांचं माहेर ठरूं लागलं आहे. या प्रकरणांत जिल्हा न्यायाधिशांनीं एका शिपायला सस्पेंड केलें आहे.

कोल्हापूरच्या तळीरामांचा नि आर्यमदिरा मंडळाचा ताळेबंद हा असा आहे. ••